Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No.2456-1665

# जागतिकीकरणाचा भारतीय आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर होणारा परिणाम

**प्रा. डॉ. विलास तुळशीराम ठाकूर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्री शिवाजी कॉलेज, कंधार.
vilasthakur13@gmail.com
Mb. 9421764294

**प्रास्ताविक : (Introduction)**

नव्या आर्थिक धोरणाचा सर्वात महत्वाचा पैलू म्हणजे जागतिकीकरण त्या वैश्वीकरण हा आहे. भारत सरकारने १९९१ पासून खुले आर्थिक धोरण स्विकारल्यामळे जग हे खेडे बनले आहे. प्रत्येक क्षेत्रात नवीन बदल होत गेले. देशातील कृषी, उद्योग, सेवा, रोजगार, तंत्रज्ञान,दळणवळण, विदेशी, स्थलांतर,पर्यावरण, रहाणीमान, शासन समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्व क्षेत्रावर पाश्चात्य वातावरणाचा परिणाम झाल्यामुळे भारतालाही अशा नव्या धोरणात बदल करावा लागला आहे. या दृष्टीनेच विविध बंधने कमी करणे किंवा यांचा समावेश नव्या आर्थिक धोरणात केलेला आहे. मागील काही वर्षात जागतिकीकरणावर विचारमंथन चालू आहे. १९९४ मध्ये उरग्वे येथील फेरीत राष्ट्रराष्ट्रातील व्यापार विषयक वाटाघटी पूर्ण झाल्यानंतर १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटना (W.T.O.) स्थापन झाली, या राष्ट्रामध्ये भारतही सामील असल्याने जागतिक मुक्त व्यापाराचे भारतीय आदिवासी समाजावर काय परिणाम होतील याची चर्चा होणे स्वाभाविक आहे.

**अर्थ : (Meaning)**

एखाद्या देशाची अर्थ व्यवस्था जागतिक अर्थकारणांशी संलग्न जोडून देणे म्हणजे त्या देशाच्या अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण होय.

**व्याख्या : (Defination)**

जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त, रोजगार, कृषी, तंत्रज्ञान, रहाणी, शासन, समाज व्यवस्था, संस्कृती, अशा सर्व क्षेत्रातून होत राहणारे रुपांतर होय असे म्हणता येईल.

**संशोधनाची उद्दिष्टये : (Objective) :**

१) आदिवासीच्या सामाजिक जीवनपध्दतीवर जागतिकीकरणाचा झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.
२) आदिवासीची साक्षरता विषयक स्थिती अभ्यासणे.
३) जागतिकीकरणाचा आदिवासींच्या आर्थिक जीवनावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.
४) जागतिकीकरण व आदिवासी रोजगार विषयक परिस्थितीचा अभ्यास करणे.
५) जागतिकीकरण व आदिवासीचे सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती : (Methodlogy)**

प्रस्तुत शोध निबंधात प्राथमिक व द्वितीयक साधन सामुग्री या दोन पध्दती आहेत परंतु माझा शोध निबंध हा द्वितीयक साधन सामुग्रीवर अवलंबुन आहे.

**द्वितीय साधन सामुग्री :-**

शोध निबंधात द्वितीय साधन सामुग्रीच्या आधारे, आकडेवारी, शासकीय अहवाल, यांच्या सहाय्याने मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

**जागतिकीकरण व आदिवासी :**

भारतात आदिवासींच्या ज्या अनेक जमाती आहेत त्या प्रत्येक जमातीचे जीवन, सांस्कृतिक वैशिष्ट्ये, चालिरिती, धार्मिकता, रुढी, परंपरा, यांच्यात सारखेपण आढळून येत नाही.

**व्याख्या :**

१) **विल्यम पी. स्कॉट :** "समान भाषा आणि संस्कृती असून असे समुह की, ज्यांनी विशिष्ट भुप्रदेश व्यापला आहे व जे अशिक्षित, परंपरागत आहेत त्यांना आदिवासी असे म्हणावे. "

२) **मरडॉक :** "आदिवासी हा एक असा सामाजिक समुह आहे, ज्याची एक स्वतंत्र भाषा, स्वतंत्र संस्कृती, व स्वतंत्र - राजकीय संघटन असते. "

**जागतिकीकरण व आदिवासी समाज :**

जागतिकीकरणामुळे समाजाच्या आर्थिक, सामाजिक राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक जीवनावर वेगवेगळे बदल झालेले दिसून येतात.

**जागतिकीकरणाचा आदिवासीच्या सामाजिक जीवनावर होणारा परिणाम :**

भारतातील वेगवेगळया राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात आदिवासीची संख्या आढळून येते. त्यांची जीवनपध्दती संस्कृती, शिक्षण, अरोग्य, सामाजिक समस्या, कुटूंबसंस्था आर्थिक स्थिती, राजकीय स्थिती या बाबतीत म्हणावे तेवढे परिवर्तन झालेले नाही. परंतु काही आदिवासी समाजाचा इतर समाजाशी संबंध आल्यामुळे त्यांची जीवनशैली ते अनुकरण करीत आहेत. पर्यायाने या समाजावर पाश्चात्य संस्कृती जीवनविषयक दृष्टीकोन, शिक्षण, अरोग्य या बाबतीत अमुलाग्र बदल झालेला दिसून येतो. त्यातील काही ठळक गोष्टी आपल्याला सांगता येतील.

१) अलिकडच्या काळात कुटूंब विषयक पध्दतीत आदिवासी मध्ये जो विवाहविषयक दृष्टीकोन होता त्यामध्ये बदल होत आहे. बहुपत्नी विवाह, पलायन विवाह याची जागा आधुनिक समाजाच्या विवाह पध्दतीने घेतली आहे. एक पत्नी विवाह, लैंगिक स्वातंत्र्याची कल्पना बदलून त्यावर मर्यादा येत आहेत युवागृहाची पध्दत बंद पडण्याच्या मार्गावर आहे.

२) मात्रसत्ताक कुटूंब पध्दतीची जागा आज आदिवासी समाजात पितृसत्ताक कुटूंब पध्दतीने घेतली आहे.

३) पारंपारिक धर्म विषयक कल्पना मागे पडून नवीन शास्त्रीय व तंत्रशुध्द विचारसरणी पुढे येत आहे. त्यामुळे आदिवासीच्या अंधश्रध्दा, जादुटोणा या विषयीच्या कल्पनेत बदल झालेला दिसून येतो.

४) ग्रामीण भागात आरोग्य विषयक रुग्णालयाची व्यवस्था उपलबध झाल्यामुळे भुकबळी, कुपोषण, राहणीमान इ. मध्ये परिवर्तन झालेले दिसून येते.

५) ब-याच आदिवासी समाजाला पारंपारिक दागिण्याऐवजी नविन दागिने घेऊ लागले आहेत.

६) नवीन घराची रचना जिवनउपयोगी वस्तू यांचा उपयोग बरेचशे आदिवासी घेत आहेत.

**जागतिकीकरणाचा आदिवासीच्या आर्थिक जीवनावर होणार परिणाम :**

पाश्चात्य संस्कृतिमुळे आदिवासींचे आर्थिक जीवन सुध्दा बदलले दिसून येते, राहणीमान, रोजगार, उत्पन्न, स्थलांतरामुळे आदिवासीच्या आर्थिक जीवनावर मोठा परिणाम झालेली दिसून येते.

१) पूर्वी आदिवासी समाज पारंपारिक शेती व्यवसाय, शिकार करुन कच्चे मांस खाणे, कंदमुळे जमा करण्याच्या पध्दतीत आमुलाग्र बदल घडून येण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. स्थिर शेती व्यवसाय, बि-बियाणे, रासायनिक खते, जलसिंचनाची साधने, संकरित पशू पैदास व पशु पालन- दुग्धजन्य पदार्थाचा व्यापार, मध-मासे इ. विक्री यामुळे आर्थिक जीवनात बदल झाला आहे.

२) आदिवासीच्या जागतिकीकरणामुळे जीवनमानावर बराचसा परिणाम झालेला दिसून येतो. बराचसा समाज रोजगाराच्या शोधात हा शहरी भागात निघालेला दिसून येतो. त्यांचे राहानीमान, उपभोग्य वस्तु यामध्ये सुध्दा टि.व्ही. सायकल, दुचाकी, मोबाईल, गॅस, पंखा, फ्रिज इ. सेवांचा उपभोग घेत असलेला दिसून येतो. एकंदरीत ह्याच्या जीवनमानात जागतिकीकरणाच्या परिणामामुळे बदल झालेला दिसून येतो.

३) आदिवासीमध्ये प्रगत समाजासारखे कामाचे विशेषीकरण झालेले नसते. तरीपण टोपल्या, चटया विणणे, खोदकाम, कोरिवकाम, मडकी तयार करणे, दगडी कोळसा फोडणे, इ. बाबतीत कामाचे विशेषीकरण झालेले आढळून येते.

४) आदिवासींच्या वाड्या-वाड्यावर रेडिओ, दुरदर्शन, मोबाईल, वृत्पत्रे व मासिके इ. प्रसारमाध्यमामुळे जनजागृती घडून येत आहे. जवळपास सगळ्या आदिवासी वस्त्यापर्यंत रस्ते तयार झाल्याचे सायकल, मोटारसायकल, स्कुटर, यासारख्या दुचाकी वाहणाबरोबरच ॲटोरिक्षा-ट्रॅक्टर, ट्रक, बस, टेंम्पो, यासारख्या तीन-चार चाकी वाहनांची ये-जा, चालू असते. त्यामुळे हा समाज शहरीकरणाशी जोडला गेला आहे.

५) दळणवळणाच्या सुवधिामळे लोकांचा ग्रामीण व नागरी, लोकांशी संपर्क वाढू लागल्याने त्यांच्या रहाणीमानात, आचार-विचारांची जागा आधुनिक विचारसरणीने घेण्यात सुरुवात केली आहे. तसेच त्यांच्यातील शिक्षणातील प्रमाण शिक्षण सामान्य लोकसंख्या व अनुसूचित जमातीची साक्षरतेची टक्केवारी पुढील प्रमाणे :

अनुसुचित जमातीची साक्षरतेची टक्केवारी

| | सामान्यलोकसंख्या | | | अनुसचित जातीची लोकसंख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| जनगणना | पुरुष | स्त्रिया | एकुण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १९७१ | ५१.०४ | २६.४३ | २९.१३ | १९.०६ | ४.२१ | ११.७४ |
| १९८१ | ५८.६५ | ३४.६३ | ४७.०२ | ३२.३० | ११.१४ | २२.२९ |
| १९९१ | ७६.६६ | ५२.३० | ६४.८७ | ४९.०० | २४.०८ | ३६.७७ |

स्त्रोत : Tribal Research bulletin vol-xix

महाराष्ट्रातील १९९१ मध्ये ६४.८७ सामान्य लोकसंख्येची टक्केवारी एवढी होती. त्यातील अनुसूचित जमातीची साक्षरतेची टक्केवारी ३६.७७. १९९१ नुसार आदिवासी मधील पुरुषांची साक्षरता ४९% आहे तर स्त्रियांची साक्षरता २४% आहे तर स्त्रियांची साक्षरता २४% आहे. १९९१ च्या जनगणनेनुसार बिगरआदिवासी मधील पुरुषांची साक्षरता ५२.३०% आहे तर त्याच ठिकाणी आदिवासी स्त्रियांची साक्षरतेची टक्केवारी २४.०८ आहे यातून आदिवासीची साक्षरता नगण्य आहे. जागतिकीकरणाच्या स्पर्धेत टिकाव लागण्यासाठी साक्षरतेमध्ये वाढ होणे अत्यंत महत्वाचे आहे.

**जागतीकीरणाचा आदिवासीच्या जीवनावर होणारा राजकीय परिणाम :**

टोळी प्रमुखांची जागा ग्राम पंचायतीच्या सरपंचाने घेतल्याने नविन राजकीय प्रक्रिया सुरु झाली आहे. गाव ते देशपातळीवरील भारतीय राजकारणात आदिवासींना राजकीय प्रतिनिधीत्वाचा लाभ होऊ लागला आहे. स्त्रियादेखील राजकारणात सहभाग घेण्याची परवानगी आपोआपच शासकीय धोरणामुळे उपलब्ध झाली आहे.

**सारांश :**

जागतिकीकरणामुळे भारतीय आदिवासी समाज अजुनही आर्थिकदृष्टया, सामाजिकदृष्टया मागास आहे. अजुनही ब-याचशा जमातीचा समाजांशी संबंध आलेला दिसून येत नाही. त्यांच्यात मोठ्या प्रमाणात दारिदय, निरक्षरता, परंपराचा प्रभाव, जादु टोण्यावर विश्वास यामुळे नविन वैज्ञानिक दृष्टीकोनावर विश्वास नसल्यामुळे वैज्ञानिक प्रगती झालेली दिसून येत नाही. शासनाया ब-याचशा योजना त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. त्यामुळे प्रचंड बेकारी, शिक्षणाचे प्रमाण कमी, दारिद्रय या समस्या या समाजापुढे आहेत. त्यातच जागतिकीकरणाच्या स्पर्धेत या समाजाचा टिकाव लागेल का ? हा प्रश्न अनुतरीत राहिल असे वाटते.

**संदर्भ :**

१. महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती- डॉ. एस.जी. देवगांवकर
२. आदिवासी समाजशास्त्र डॉ. दा.धो. काचोळे कैलाश पब्लीकेशन, १४ जाने. २००९
३. आदिवासी ठाकर समाजशास्त्रीय अभ्यास डॉ. रमेश सुर्यवंशी (प्रथमावृत्ती) १ जुन २०१०
४. जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने
५. प्रा.जगन कराडे (डायमंड प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १४ जानेवारी २००८.)